RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४४]　　शुक्रवार, मार्च ११, २०११/फाल्गुन २०, शके १९३२　　[ पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

**असाधारण क्रमांक १६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.**—बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . | **पृष्ठे** १-२ |

दिनांक २७ फेब्रुवारी २०११ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ११ मार्च २०११ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६५ चा २१. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, बोनस प्रदान अधिनियम, १९६५,महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १७ सप्टेंबर २०१० रोजी बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, २०१० प्रख्यापित केला होता ; (२०१० चा महा. अध्या. १२.)

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १७ सप्टेंबर २०१० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा अधिनियम क्रमांक २१ यामध्ये कलम ११क समाविष्ट करणे.

**२.** बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) त्याच्या कलम ११ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६५ चा २१.

बोनस प्रदान करण्याची पद्धत.

"**११क.** या अधिनियमाअन्वये बोनस म्हणून एखाद्या कामगाराला देय असणाऱ्या सर्व रकमा, कामगाराच्या नावे त्याच्या खात्यात रक्कम देय असलेला धनादेश काढून त्याद्वारे किंवा कामगाराच्या बँक खात्यामध्ये त्या जमा करून, देण्यात येतील.".

सन १९६५ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १९ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ मधील "रोखीने" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, २०१०, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २०१० चा महा. अध्या. १२.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदीन्वये करण्यात आलेली कृती किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ६० ] शुक्रवार, मार्च ११, २०११/फाल्गुन २०, शके १९३२ [ पृष्ठे २, किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक १६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Payment of Bonus (Maharashtra Amendment) Act, 2010 (Mah. Act No. III of 2011), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. III OF 2011.

*(First published, after having received the assent of the President in the "Maharashtra Government Gazette", on the 11th March 2011).*

An Act further to amend the Payment of Bonus Act, 1965, in its application to the State of Maharashtra.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Payment of Bonus Act, 1965, in its application to the State of Maharashtra, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Payment of Bonus (Maharashtra Amendment) Ordinance, 2010, on the 17th September 2010 ;

21 of 1965.

Mah. Ord. XII of 2010.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

**1.** *(1)* This Act may be called the Payment of Bonus (Maharashtra Amendment) Act, 2010. Short title and commencement.

*(2)* It shall be deemed to have come into force on the 17th September 2010.

Insertion of section 11A in Act 21 of 1965.

**2.** After section 11 of the Payment of Bonus Act, 1965, in its application to the State of Maharashtra (hereinafter referred to as "the principal Act"), the following section shall be inserted, namely :— 21 of 1965.

Mode of payment of bonus.

"**11A.** All amounts payable to an employee by way of bonus under this Act shall be paid either by an account payee cheque drawn in favour of the employee or by crediting the same in the bank account of an employee.".

Amendment of section 19 of Act 21 of 1965.

**3.** In section 19 of the principal Act, the words "in cash" shall be deleted.

Repeal of Mah. Ord. XII of 2010 and saving.

**4.** *(1)* The Payment of Bonus (Maharashtra Amendment) Ordinance, 2010, is hereby repealed. Mah. Ord. XII of 2010.

*(2)* Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the provisions of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done or taken, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.